**MHSI**06-000335-2026 | सं.फौ.खटला क्र. १५२/२०२६

निशाणी क्र. ३

**श्रीमती जे.एम. मिस्त्री, न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, सावंतवाडी यांचे न्यायालयात**

१. अपराध घडल्याची तारीख : ०९/०१/२०२६

२. फिर्याद दाखल केल्याची तारीख : १०/०१/२०२६

३. फिर्यादीचे नाव, वय व पत्ता : दुर्गेश प्रसाद यादव, सहा. उपनिरीक्षक कणकवली.

४. आरोपीचे नाव, वय व पत्ता : संजय सुरेश चौधरी,
वय : ३१ वर्षे, धंदा-मोलमजुरी,
रा. सिकंदरपुर, पो. सिकंदरपुर,
प्रखंड अंचलरतनी, फरीदपुर,
जि. जहानाबाद, बिहार.

५. गुन्हयाचा तपशील :

ज्याअर्थी दि.०९/०१/२०२६ रोजी २३.३५ ते २३.४० वाजण्याच्या सुमारास मडुरा-सावंतवाडी रेल्वे स्टेशन के मध्य किमी. नं. ३६८/०४ येथे गाडी क्र. १२६२० मत्स्यगंधा एक्सप्रेस या गाडीच्या जनरल डब्यामध्ये तुम्ही गाडीमध्ये बसण्यासाठी सिट मिळण्यासाठीचे कारणावरुन तुम्ही दुसऱ्या प्रवाशांसोबत भांडण करुन सदर गाडीची चेन ओढून प्रवाशांच्या प्रवासात बाधा उत्पन्न केली आणि त्याद्वारे तुम्ही रेल्वे अधिनिमयचे कलम १४१ व १४५(ब) अन्वये शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाचे दखलगिरीतील गुन्हा केला.

५(ब). कलम व अधिनियम :- रेल्वे अधिनिमयचे कलम १४१ व १४५(ब) अन्वये

**आरोपीचा जबाब-**

प्रश्न १. तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय?

उत्तर : होय.

प्रश्न २. तुमच्याविरुध्द दाखल केलेला गुन्हा तुम्हास मराठीतून वाचून व समजावून सांगण्यात आला तो तुम्हास समजला काय?

उत्तर : होय.

प्रश्न ३. तुम्हास गुन्हा कबूल आहे काय?
उत्तर : होय. मला गुन्हा कबूल आहे.

........................

आरोपीची सही

समक्ष,

सही/-

**(जा.म. मिस्त्री)**

**दिनांक -०९/०६/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग**

**सावंतवाडी.**

**<u>आदेश</u>**

**(पारीत केला दि.०९/०६/२०२६)**

१. आज रोजी आरोपी माझ्यासमोर हजर झाला. त्याने अर्ज दाखल करुन गुन्हा कबूल करीत आहे असे कथन केले आहे. पुढे त्याने अर्जामध्ये कमीत कमी दंडावरती मुक्तता करण्यात यावी, अशी विनंती केली आहे. त्याने केलेला गुन्हा हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे.

२. वरील सर्व बाबी विचारात घेता व आरोपीविरुध्दच्या खटल्याचे स्वरुप विचारात घेता, न्यायाचा अंतिम हेतू साध्य करण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी संजय सुरेश चौधरी यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये रेल्वे अधिनिमयचे कलम १४१ व १४५(ब) खालील गुन्ह्याकरिता दोषसिद्ध ठरविण्यात येत आहे.

२. आरोपीला रेल्वे अधिनिमयचे कलम १४१ खालील गुन्हयाकरिता रक्कम रु.५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) दंड भरण्याची तसेच दंड न भरल्यास १ दिवस साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येते.

३.  आरोपीला रेल्वे अधिनिमयचे कलम १४५(ब) खालील गुन्हयाकरिता रक्कम रु.५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) दंड भरण्याची तसेच दंड न भरल्यास १ दिवस साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.06.09 15:32:39 +0530

**(जा.म. मिस्त्री)**

**दिनांक -०९/०६/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सावंतवाडी.**